# प्रकरण –18

अन्य उपयुक्त माहिती

1) वारंवार विचारले जाणारे प्रश्न -

अ) रुग्णालयामध्ये रकपेढी आहे काय ?

उत्तर – नाही, रुग्णालयामध्ये रक्त पेढी नाही.

ब) रुग्णालयामध्ये वेगळे भाडे भरुन खास कक्ष उपलब्ध आहेत काय ?

उत्तर – आहे. परंतु लोक आर्थिक दृष्टया मागासलेले असल्याने अशी सुविधा रुग्ण फारच क्वचित घेतात.

क) वरिष्ठ डॉक्टर उपलब्ध आहेत काय ?

उत्तर – आहेत. जवळ जवळ सर्वच विभागांमध्ये वरिष्ठ डॉक्टर्स उपलब्ध आहेत.

ड) त्यांना औषधांसाठी वेगळा खर्च करावा लागेल काय ?

उत्तर – नाही. औषधे विनामूल्य दिली जातात.

ई) रुग्णालयात तात्काळ विभाग आहे काय ?

उत्तर – होय, रुग्णालयामध्ये अपघात विभाग आहे, परंतु खास संकटकालीन सुविधा उपलब्ध नाहीत. उदा. सी.टी. स्कॅन, इ.सी.जी. व 24 तास सोनोग्राफी सुविधा उपलब्ध नाहीत.

बाहय रुग्ण विभाग, रविवार व सार्वजनिक सुटटया सोडून इतर सर्व दिवस खुला असतो परंतु तात्कालिन सेवा 356 दिवस उपलब्ध असतात. सर्व आपत्कालीन प्रकरणे हाताळली जातात व रुग्णांची नोंदणी करुन घेण्यात येते. ज्या रुग्णांना तृतीय स्वरुपाची सुश्रुषा आवश्यक असते अशा रुग्णांना पुढील व्यवस्थेसाठी मध्यवर्ती संस्थेमध्ये स्थानांतरीत करण्यात येते.

एफ) त्यांना क्ष-किरण चित्र /ह्दय स्पंदन आलेखासाठी वेगळे शुल्क भरावे लागेल काय ?

उत्तर – होय. क्ष-किरण / ह्दय स्पंदन आलेख सुविधा पूरक दराने पुरविल्या जातात.

2. रुग्णास कोणत्याही प्रकारची माहिती हवी असल्यास, त्याने साध्या कागदावर त्याचे नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, दस्तऐवजाचे नांव / हवी असलेली माहिती/सदर दस्तऐवज/ माहिती कोणत्या कारणासाठी हवे आहे ते कारण/ शुल्क आणि सहीसह अर्ज देणे आवश्यक आहे. सदर अर्ज वैद्यकीय अधिक्षक / वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांचेकडे पाठविला जाईल. वैद्यकीय अधिक्षक / वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांनी संमती दिल्यानंतर दस्तऐवजाची छायांकित प्रत / माहिती वाजवी वेळामध्ये पुरविली जाईल.

3. रुग्ण / नमगरिकांना देण्यात येणारे प्रशिक्षण

पुढील प्रशिक्षणे रुग्णांना / नागरिकांना देण्यात येतात प्रसुतीपूर्व काळजी, कुटुंब नियोजन, लसीकरण, स्तनपान, ओ.आर.एस., एच.आय.व्ही./एड्स संबंधी माहीती तसेच आरोग्यविषयक शिक्षण.

प्रशिक्षण सत्रे बाहय रुग्ण विभागामध्ये प्रशिक्षित आणि अनुभवी समुपदेशकांद्वारे दिले जाते. प्रशिक्षणाअंतर्गत दृक श्राव्य साधनांचा आणि आयइसी साहित्याचा उपयोग केला जातो. प्रशिक्षणचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही पूर्व अटी नाहीत. प्रशिक्षण विनामूल्य दिले जाते. रुग्णालयाशी संलग्न असलेल्या आरोग्य-सेवकांद्वारे नागरिकांना अशा प्रशिक्षण सत्रांचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त केले जाते.

**4.** रुग्णालयाद्वारे दिली जाणारी प्रमाणपत्रे -

| अनु .क्र. | प्रमाणपत्राचे नाव | शुल्क | अर्ज करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | वयाचे प्रमाणपत्र | रु. 30/- | वै. अभिलेख अधिकारी |
| 2 | उपचार चालू असल्याचे प्रमाणपत्र | रु. 30/- | वै. अभिलेख अधिकारी |
| 3 | शारिरिक सक्षमता प्रमाणपत्र | रु. 30/- | वै. अभिलेख अधिकारी |
| 4 | अपंगत्व प्रमाणपत्र | रु. 150/- | वै. अभिलेख अधिकारी |
| 5 | क्षति प्रमाणपत्र | रु. 100/- | वै. अभिलेख अधिकारी |
| 6 | जीवन विमा दावा प्रमाणपत्र | रु. 150/- | वै. अभिलेख अधिकारी |

यासाठी नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक हवे असल्यास प्रमाणपत्राचा तपशिल व रुग्णांची सही असलेला अर्ज साध्या कागदावर वैद्यकीय अभिलेख तंत्रज्ञ यांना करणे आवश्यक आहे. त्याबरोबर रुग्णाच्या केस पेपर्सच्या छायांकित प्रती जोडाव्या. यासाठीचे शुल्क रोख भरावे. अर्ज संबंधित विभागाचे डॉक्टर / वैद्यकीय अधिक्षक / वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांनी मंजूर करणे आवश्यक आहे. वैद्यकीय अभिलेख तंत्रज्ञ सदर प्रमाणपत्र त्याच दिवशी देतील.

सही/-
वैद्यकिय अधिक्षक,
के.बी.भाभा रुग्णालय कुर्ला(प)